# गलतीकरांस GALATIANS

# गलतीकरांस

## 1

1 येशू ख्रिस्त ज्यांना परमेश्वराने मेलेल्यांतून जिवंत उठविले होते त्यांचा प्रेषित पौल जो परमेश्वराद्वारे पाठविलेला आहे,
मनुष्यांद्वारे नव्हे. 2 गलतीयातील सर्व चर्चकरितां हे पत्र, त्या भावांकडून देखील आहे जे माझ्याबरोबर आहेत.
3 आम्हां सर्वांकडून तुम्हांला स्वर्गीक पिता आणि प्रभू येशू ख्रिस्तांची असीम कृपा (अनुग्रह) आणि शांति मिळावी.
4 येशूंनी, ज्यांनी आपल्या पित्याच्या इच्छेच्या आधारें, आमच्या अपराधांकरिता (अपराध) आपल्या स्वतःला देऊन
टाकले, यासाठी की आम्हांला या दुष्ट आणि वाईट जगांपासून सोडवून घ्यावे. 5 सर्व स्तुति, सन्मान आणि गौरव
सदासर्वकाळ त्यांनाच असो . होय, असेच होवो.
6 ज्या येशू ख्रिस्तांनी तुम्हांला आपल्या विपुल कृपेने मुक्ति दिली होती,त्यांच्यापासून वळून तुम्ही एका वेगळया
प्रकारच्या विचारधारेने प्रभावित होत आहा याचे मला आश्चर्य वाटते. 7 ती विचारधारा आणि तिची शिकवण चांगली
नाहीये. परंतु कांही लोक तुम्हांला, त्रास व पीडा देत आहेत आणि ख्रिस्तांची आनंदमय वार्ता भ्रष्ट करीत आहेत आणि
येशूवार्ता भलतीकडे नेत आहेत. 8 जर आम्ही किंवा स्वर्गातील एखादा देवदूत त्या सर्वोत्तम वार्तेहून आणखी दुसरा
वेगळा संदेश प्रचार करीत असेल तर त्यांस दंड मिळो. 9 मी आधी सांगून चुकलो आहे (सांगितले) आणि एकदा पुन्हा
सांगतो आहे, जर मी सांगितलेल्या उद्धार वार्तेहून एखादा कोणी निराळी वार्ता सांगत असेल तर त्याला दंड मिळो.
10 मला मनुष्यांची मेहेरबानी आणि प्रशंसा हवी आहे, किंवा या जगाच्या स्वामींचा पाठिंबा व अनुग्रह? मी मनुष्यांना
आनंदी करण्याची चेष्टा करीत आहे काय? कारण जर मी अजूनही मनुष्यांची मर्जी संपादन करून त्यांना खुश करण्याचा
प्रयत्न करीत आहे, तर मी ख्रिस्तांचा सेवक असूंच शकत नाही.
11 परंतु माझ्या बंधुभगिनींनो, मी तुम्हांला सांगतो की जी उद्धारवार्ता मी तुम्हांला सांगितली होती ती मनुष्यापासूनची
नाहीच मुळी; 12 कारण मी ती वार्ता मनुष्यापासून प्राप्त (मिळविलेली) केलेली नाहीये, किंवा कोणी मला ती शिकविलीही
नव्हती. परंतु मी ती येशू ख्रिस्तांपासून शिकलो होतो,
13 कारण यहूदी मताचा असताना, माझे आचरण व व्यवहार कसा होता याविषयी तुम्ही ऐकलेले आहे, ते हेच की मी
कशा प्रकारे अमर्यादित स्वरूपात परमेश्वराच्या चर्चचा छळ करून त्यांना नष्ट करून टाकण्याचाही प्रयत्न केलेला होता.
14 माझ्या स्वतःच्या देशांत आणि यहूदी मताच्या पुष्कळ लोकांच्या तुलनेंत मी फार पुढे गेलो होतो. त्यांच्या तुलनेंत
आपल्या पूर्वजांच्या परंपरांचा आवेश व उत्साह, माझ्याठायी भक्कम (खूप जास्त) होता. 15 परंतु ज्या वेळी परमेश्वर ज्याने
मला आपल्या विपुल कृपेने, मातेच्या गर्भातून बोलाविलेले होते, 16 की आपल्या पुत्राला माझ्याठायी प्रगट करावे,
अशाकरितां की गैरयहूदी लोकांत मी आनंदवार्ता घोषित करावी, त्या वेळी मी आपल्या इच्छेची पर्वा केली नाही.
17तसेच माझ्यापूर्वी नियुक्त केलेल्या प्रेषितांचा सल्ला देखील घेतला नाही, पण मी सरळ अरबस्तानांत निघून गेलो आणि
दिमिष्कांस पुन्हा परत आलों.
18 तीन वर्षानतर, मी पेत्राला भेटावयास म्हणून यरूशलेमेस गेलो आणि पंधरा दिवस त्याच्याबरोबर राहिलो. 19 तेथे
येशूंचा भाऊ याकोब याशिवाय, माझी भेट येशूंच्या दुसऱ्या कोणत्याही प्रेषिताशी झाली नाही. 20 हे सर्व खोटे नाहीये
कारण मी परमेश्वराच्या उपस्थितीची जाणीव ठेवून लिहीतो आहे. 21 यानंतर मी सूरिया आणि किलिकियाच्या क्षेत्रांत
आलो. 22 परंतु ख्रिस्तांठायी असलेल्या यहूदीयांतील चर्चने, माझा चेहरा (तोंड) अजूनपर्यंतही पाहिलेला नव्हता.
23 त्यांनी केवळ हेच ऐकलेले होते, की जो पूर्वी आपला छळ करीत असे व जी नाश करण्याचा तो प्रयत्न करीत होता,
आता स्वतः त्याच उद्धार वार्तेचा प्रचार (घोषणा) करीत आहे , 24 तसेच ते माझ्या परिवर्तनाकरितां परमेश्वराचे गौरव
करीत असत.

# 2

1 चौदा वर्षांनंतर मी तीत आणि बर्णबा यांच्याबरोबर पुन्हा यरूशलेमेस गेलो. 2 स्वर्गीक मार्गदर्शन प्राप्त केल्यानंतरच
मी असे केले होते, याकरितां की जी उद्धार वार्ता मी गैरयहूदी लोकांत घोषित केली होती तीच यहूदी लोकांसमोर
गाजवावी; असे मी आदरणीय लोकांबरोबर खाजगी रीतिने केले केवळ यासाठीच की माझी धाव (परिश्रम) व्यर्थ ठरू
नये. 3 तरीही तीत जो ग्रीक होता आणि माझ्याबरोबर होता, सुंता करवून घेण्यास त्यावर सक्ती केली नाही. 4 हे सर्व
काही त्या खोटया भावांमुळे घडले जे गुप्त रीतिने आणले गेले होते. ख्रिस्त येशूंठायी आम्हांला जी स्वच्छंदी मिळाली
होती, तिच्यापासून आम्हांला दूर करण्यासाठी ते चोरटी व गुप्त हेरगिरी (जासूसी) करीत होते. 5 येशू वार्तेची सत्यता
तुमच्याठायी कायम रहावी म्हणून आम्ही एक क्षणभर देखील स्वतःला त्यांच्या आधीन होऊ दिले नाही.
6 जे लोक मोठे प्रतिष्ठित समजले जात होते त्यांच्यापासून मला कांहीही प्राप्त झाले नाही, ते कसे होते याचाही
माझ्यावर कोणताच परिणाम झाला नाही, कारण परमेश्वर कोणाचाही पक्षपात (वशिलेबाजी) करीत नाही. 7 या विपरित
त्यांनी स्वत: पाहिले की सुंता न झालेल्या लोकांना ती सांगण्याची जवाबदारी मला सोपविली होती, अगदी त्याचप्रमाणे
जशी पेत्राला सुंता झालेल्यांना येशू वार्ता सांगण्याची जवाबदारी दिलेली होती. 8 जो पवित्र आत्मा पेत्राच्या प्रेषितपणाच्या
सेवाकार्यात प्रभावीपणे कार्यरत होता, तोच परिणामकारक रीतिने माझ्याद्वारे गैरयहूदी लोकांत काम करीत होता;
9 जेव्हा याकोब, केफा आणि योहान जे आधारस्तंभ समजले जात होते मला मिळालेली कृपा (माझा पालट) पाहिली,
तेव्हा त्यांनी बर्णबा आणि मला सहभागितेचा उजवा हात दिला म्हणून आम्ही गैरयहूदी लोकांकडे जावे आणि त्यांनी
यहूदी लोकांकडे जावे, हा सल्ला त्यांनी मान्य केला. 10 परंतु आम्ही गरिबांचे स्मरण असूं द्यावे असे त्यांना हवे होते. मी
सुद्धा तीच गोष्ट करावयास तयार होतो.
11 ज्या वेळी पेत्र अंत्युखियास आला, त्या वेळी मी त्याच्या तोंडावर त्याचा विरोध केला कारण तो दोषी होता.
12 कारण याकोबाकडून काही लोक येण्यापूर्वी तो गैरयहूदी लोकांबरोबर भोजन करीत असे, परंतु जेव्हा ते तेथे पोहचले
तेव्हा सुंता झालेल्यांच्या भीतिने त्याने स्वतःला वेगळे करून घेतले होते. 13 दुसरे यहूदी सुद्धा त्याच्याबरोबर धोक्यात
सापडले, इतके की बर्णबा देखील त्याच ढोंगात (कपट) वाहून गेला.
14 ज्या वेळी मी असे पाहिले की ते खऱ्या वार्तेच्या सत्यानुसार व्यवस्थित आचरण करीत नाहीत, त्या वेळी मी
सर्वांच्यासमोर पेत्राला म्हटले, “यहूदी असूनही जर तू गैरयहूदी लोकांप्रमाणे जीवन जगशील आणि यहूदी लोकांसारखे
नाही, तर तू दुसऱ्या गैरयहूदी लोकांनी यहूदी लोकांसारखे वागावे म्हणून त्यांच्यावर सक्ती का करतोस?
15 जरी आपण जन्मतः यहूदी असलो आणि गैरयहूदी लोकांतून नाही, 16 तरी याविषयीची जाणीव ठेवून की मनुष्य
नियमशास्त्रानुसार कृत्य केल्याने नव्हे, तर केवळ येशू ख्रिस्तांवर विश्वास ठेवल्यामुळे नीतिमान (क्षमा झालेला व सिद्ध
असा) ठरतो, आम्ही देखील नीतिमान ठरविले जावे म्हणून येशू ख्रिस्तांवर विश्वास केला, परंतु नियमशास्त्रानुसार नव्हे,
कारण नियमशास्त्रानुसार करणारा कोणताही मनुष्य सिद्ध (नीतिमान) प्रमाणित होणार नाही.
17 आपण जे ख्रिस्तांठायी 'नीतिमान परमेश्वरासमक्ष' पूर्ण ठरू इच्छितो, जर स्वतःच अपराधी (गुन्हेंगार) असलो तर
त्या अर्थी, सेवक होण्याकरिता आपल्याला ख्रिस्तांनी प्रेरित केले आहे काय? मुळीच नाही. 18 कारण जे काही मी पाडले
आहे ते पुन्हा उभारीत असेन, तर स्वतः मीच परमेश्वरी कायदा मोडणारा ठरतो. 19 कारण मी नियमशास्त्राद्वारेच मेलो,
जेणेकरून मी परमेश्वरासाठी जगावे. 20 मी ख्रिस्तांबरोबर क्रूसावर खिळला गेलो आहे. आता मी नव्हे, परंतु ख्रिस्त
माझ्याठायी जिवंत आहेत. म्हणून माझ्या देहामध्ये मी जे जीवन मी जगतो आहे, ते परमेश्वराचा पुत्र येशू यांच्या
विश्वासयोग्यतेमुळे आहे, ज्यांनी माझ्यावर प्रेम केले आणि स्वतःला माझ्याकरिता कुर्बान केले. 21 परमेश्वराची असीमित
कृपा मी बाजूला करीत (त्याकडे डोळेझाक करीत नाही) नाही. कारण जर नियमशास्त्राद्वारे नीतिमान (सिद्ध) ठरविले
जाणे असते, तर ख्रिस्तांचे मरण व्यर्थ (निष्फळ) झाले असते.

# 3

1 अरे मूर्ख गलतीकरांनो, कोणी तुम्हांला मुग्ध (मोहित) केले आहे की तुम्ही सत्य मानू नये. येशू अगदी तुमच्या
डोळयांपुढे जणू क्रूसावर खिळलेले असे दाखविले गेले होते. 2 मी तुम्हांला एक गोष्ट विचारतो: "पवित्र आत्मा तुम्हांला
नियमशास्त्राचे पालन केल्यामुळे मिळाला होता, किंवा तो तुम्हांला विश्वासाने ऐकण्यामुळे मिळाला होता?" 3 पवित्र
आत्म्यांत प्रारंभ केल्यानंतर, आता आपल्या इच्छेनुसार करून तुम्ही सिद्धता प्राप्त करू शकाल काय? तुम्ही इतके मूर्ख
आहा काय? 4 तुम्ही इतके सर्व व्यर्थच सहन केले काय? जर होय, तर सर्व काही व्यर्थ (बेकार) ठरले. 5 जो तुम्हांला
पवित्र आत्मा देतो आणि तुमच्यामध्ये अद्भुत कृत्यें करितो, तो नियमशास्त्राच्या आधारे केल्यामुळे करतो किंवा तुम्ही
विश्वासपूर्वक ऐकल्यामुळे करतो?

6 अब्राहामाने विश्वास ठेवला आणि तो त्याच्याकरिता नीतिमत्व असा गणला गेला. 7 म्हणून तुम्ही समजून घ्या, की ते
जे विश्वास ठेवतात, तेच अब्राहामाचे पुत्र व कन्या आहेत. 8 'विश्वासाद्वारें गैरयहूदी लोक सिद्ध वा दंड मुक्त ठरविले
जातील आणि सर्व राष्ट्रें तुझ्याकडून आशीर्वाद मिळवतील,' ही येशू मुक्ति वार्ता पूर्वीपासूनच घोषित केली होती, ही
बाब लक्षांत ठेवा. 9 यास्तव ज्यांच्याठायी विश्वास आहे ते विश्वास करणाऱ्या अब्राहामाबरोबर आशीर्वादित असे आहेत.

10 कारण जितके नियमशास्त्राच्या कृत्यांवर अवलंबून आहेत, ते सर्व दंडाच्या आधीन आहेत. कारण असे लिहिले
आहे, 'जो कोणी (प्रत्येक जण) नियमशास्त्रात लिहिलेल्या प्रत्येक गोष्टीत टिकून रहात नाही, तो दंडित (दंडाधीन) आहे.'
11 परंतु ही बाब देखील स्पष्ट आहे की नियमांचे पालन केल्यामुळे कोणताही मनुष्य परमेश्वराच्या दृष्टीने सच्चा व निर्दोषी
ठरीत नाही, कारण जो क्षमाप्राप्त मनुष्य आहे तो विश्वासाने जगेल. 12 नियमशास्त्राचा, विश्वासाशी काहीएक संबंध
नाहीये, परंतु जो मनुष्य त्याचे पालन करितो तो त्याच्याद्वारे आमरण सुख चाखीत राहील; 13 ख्रिस्त येशूंनी आपल्याला
नियमशास्त्राच्या दंडापासून मुक्त केलेले आहे (कारण असे लिहिले आहे, 'की प्रत्येक तो मनुष्य जो क्रूसावर खिळला
जातो तो दंडित आहे)', 14 जेणेकरुन आपल्याला विश्वासाद्वारें पवित्र आत्म्याच्या प्रतिज्ञा (अभिवचन) मिळाव्यात आणि
येशूंद्वारे अब्राहामाचा आशीर्वाद गैरयहूदी लोकांपर्यंत पोहंचविला जावा.

15 बंधूभगिनींनो, मी लोकांच्या जीवन शैलीविषयी बोलतो आहे. एकदा जेव्हा मनुष्याद्वारें केलेल्या कराराची पुष्टि
होऊन जाते, तेव्हा कोणीही तो करार खारीज करु शकत (रद्द) नाही, किंवा त्यांत काही भर घालीत नाही. 16 अब्राहाम
आणि त्याच्या वंशाशी करार केला गेला होता. याठिकाणी 'वशांशी' लिहिलेले नाहीये, परंतु 'तुझ्या वंशाबरोबर' ज्याचा
अर्थ आहे एक पुरूष, जे ख्रिस्त आहेत. 17 मी असे म्हणतो की नियमशास्त्र जे चारशे तीस वर्षांनंतर दिले गेले,अभिवचन
सत्य ठरावे म्हणून ते ख्रिस्तांत पूर्वीपासूनच सिद्ध केले होते. 18 म्हणून ज्या अर्थी वतन नियमशास्त्राने प्राप्त होते, त्या अर्थी
ते प्रतिज्ञेवर (करार) आधारलेले नाहीये, परंतु परमेश्वराने ते अब्राहामाला प्रतिज्ञेद्वारे दिले.

19 मग आता नियमशास्त्राचा काय लाभ आहे? जोपर्यंत प्रतिज्ञेचे संतान (वंश) येत नाहीत, (ज्यांच्याबरोबर प्रतिज्ञा
केलेली होती) अपराधांमुळे ती प्रतिज्ञा नंतर जोडली गेली होती व ती मध्यस्थ आणि देवदूत यांच्याद्वारें निर्धारित (नेमले)
केलेली होती. 20 मध्यस्थ एकाच पक्षाकरिता नसतो, परंतु परमेश्वराकरिता असेच आहे.

21 तर मग आता नियमशास्त्र परमेश्वराच्या अभिवचनांविरूद्ध (प्रतिज्ञा) आहे काय? मुळीच नाही; कारण जर
नियमशास्त्र जीवनदायक असते तर ते जीवन देऊ शकले असते व नीतिमत्व, नियम व आज्ञांच्या पालनांद्वारे मिळाले
असते. 22 जो अपराधांत आहे त्या प्रत्येकाला वचनाने (नियमशास्त्र) दंडित केले आहे, जेणेकरून जे अभिवचन ख्रिस्त
येशूंवर विश्वास केल्यामुळे मिळते, ते सर्व विश्वास करणाऱ्यांना दिले जावे.

23 परंतु विश्वास येण्यापूर्वी आपल्याला नियमशास्त्राच्या आधीन ठेवले गेले होते, यासाठी की प्रगट होणारा विश्वास,
प्रगट होईपर्यंत आपण त्याच्याच आधीनतेंत रहावे. 24 म्हणून नियमशास्त्र आपल्याला ख्रिस्तांपर्यंत आणण्यासाठी
(पोहंचविण्यासाठी) शिक्षक ठरले, जेणेकरून आपण विश्वासाच्या आधारे नीतिमान ठरविले जावे. 25 परंतु आता विश्वास
पोहंचल्यामुळे, आपण शिक्षकाच्या आधीन राहतां कामा नये.

26 येशूंवर विश्वास करण्याद्वारें, तुम्ही सर्व परमेश्वराचे संतान आहां. 27 तुमच्यांपैकी जितक्यांचा ख्रिस्तांमध्ये बाप्तिस्मा
झालेला आहे,/ त्यांनी ख्रिस्तांना पांघरून (आवरण) घेतलेले आहे. 28 आता ना कोणी यहूदी आहे, ना कोणी गैरयहूदी .
गुलाम आणि स्वतंत्र यात कोणतेच अंतर नाही, पुरूष किंवा स्त्री असा भेद नाहीच मुळी. येशू ख्रिस्तांठायी तुम्ही सर्व

समान आहा, 29 जर वचनानुसार तुम्ही ख्रिस्तांचे आहा, तर अब्राहामाचा वंश आणि वारसदारही आहा.

# 4

1 आता मी असे म्हणतो की 'एक बाळ वारसदार', ज्याचा सर्व गोष्टींवर अधिकार आहे, अधिकार असूनही तो
गुलामांपेक्षा वेगळा नाहीये. 2 नियुक्त समयापर्यंत तो पित्याने नेमलेल्या, व त्याची काळजी वाहणाऱ्याच्या आणि
प्रबंधकाच्या आधीन आहे. 3 आपण देखील आपल्या बालपणाच्या समयी, या जगांतील पायाभूत (मुलभूत) वस्तूंच्या
गुलामीत होतो. 4 परंतु समयाची पूर्णता झाल्यानंतर, परमेश्वराने स्त्रीद्वारें आपला पुत्र पाठविला जो नियमांच्या आधीन
जन्मला होता, 5 याकरितां की जे लोक त्या समयी नियमाच्या चौकटींचे बंदिस्त होते, त्या सर्वांना अधिकार प्राप्त
असलेल्या संतानासारखे दत्तक घेतले जावे. 6 तुम्ही पित्याचे संतान ठरल्यामुळे, त्याने आपल्या पुत्राचा आत्मा आपल्या
अंतःकरणांत पाठविला, जो 'अब्बा' अशी हाक मारून पुकारतो. 7 याच कारणास्तव आता तुम्ही गुलाम नाही, पण पुत्र व
कन्या आहा आणि जर तुम्ही पुत्र व कन्या आहा, तर ख्रिस्तांद्वारें वारसदार देखील आहा.

8 पण एक समय असा होता ज्या वेळी तुम्ही परमेश्वराला ओळखीत नव्हता, त्या वेळी स्वभावतः तुम्ही त्यांचे गुलाम
होतात जो ईश्वर नव्हता. 9 आता जेव्हा तुम्हांला परमेश्वराची ओळख झालेली आहे, तेव्हा त्यानंतरही पुन्हा तुम्ही त्याच
कमजोर आणि प्रारंभीच्या गोष्टींची आवड धरून त्यांच्या गुलामीत जात आहा, ही काय गोष्ट आहे? 10 तुम्ही दिवस,
महिने आणि वेगवेगळे समय पाळणारे झाला आहा; 11 मला या गोष्टीची खरोखर भीति वाटते, की मी तुमच्याकरिता जे
परिश्रम केले ते व्यर्थ होऊ नयेत.

12 भावांनोबहिणींनो, मी तुम्हांला विनंती करितो की जसा मी तुमच्यासारखा झालो, तुम्ही देखील माझ्यासारखे
व्हा.कशा प्रकारेही माझे नुकसान तुम्ही केले नाही. 13 तुम्हांला ठाऊक आहे की माझ्या शारीरिक अशक्तपणामुळे मी
तुम्हांला पहिल्या वेळी येशू वार्ता सांगितली होती. 14 माझ्या शरीरांत जी दुर्बलता मी सोसली, ती तुम्ही तुच्छही लेखली
नाही किंवा त्याची थट्टाही केली नाही, याउलट तुम्ही परमेश्वराच्या देवदूताच्या रूपात माझा स्वीकार केला, येथवर की
तुम्ही मला ख्रिस्त येशू समान समजला. 15 ज्या आशीर्वादाविषयी तुम्ही बोलत होता, ते सर्व कोठे आहेत? कारण मी
तुमच्याविषयी अशी साक्ष दिली होती, की शक्य असते तर तुम्ही आपले डोळे उपटून ते मला दिले असते. 16 आता मी
तुम्हांला सत्याविषयी सांगतो आहे, या कारणाने तुमचा शत्रु झालो काय?

17 ते एखाद्या चांगल्या हेतूने तुम्हांला आकर्षित करून,बहकवून, आपला मित्र करू इच्छितात असे नव्हे, पण होय ते
तुम्हांला आमच्यापासून वेगळे करू पाहतात, 18 म्हणजे मग तुम्ही मोठ्या उत्साहाने त्यांच्या मागे जाऊन त्यांचे ऐकावे.
एखाद्या उत्तम बाबीविषयी नेहमी आवेशी असणे बरें आहे, पण केवळ तेव्हाच नाही जेव्हा मी तुमच्याबरोबर आहे!
19 माझ्या लहान मुलांनो, जो पर्यंत ख्रिस्त (ख्रिस्तांचे स्वरूप) तुमच्याठायी निर्माण होत नाही, तो पर्यंत मी तुमच्यासंबंधी
प्रसूतिची पीडा सहन करितो आहे. 20 तुमच्याबरोबर रहावे, आपली बोली शैली बदलावी, अशी माझी इच्छा आहे कारण
मी तुमच्याविषयी संभ्रमांत व पेचांत पडलेलो आहे.

21 आतां मला सांगा तुम्ही जे नियमशास्त्राचे पालन करण्याची इच्छा बाळगता, त्याच नियमशास्त्राचे तुम्ही का ऐकत
नाही? 22 कारण असे लिहिले आहे, 'की अब्राहामाला दोन मुलगे होते, एक त्याच्या दासीपासून आणि दुसरा त्याच्या
पत्नीपासून.' 23 शारीरिक इच्छेने जो मुलगा दासीपासून जन्मला, तो अब्राहामाचा स्वतःचा फैसला होता, परंतु जो मुलगा
त्याच्या पत्नीपासून जन्मला, तो परमेश्वरातर्फे मिळालेल्या प्रतिज्ञेमुळे (वचन) होता.

24 या गोष्टी एका प्रतिकाच्या स्वरूपात आहेत, कारण हे दोन करार आहेत. एक सीनाय पर्वतावरून केलेला करार
आहे, जो गुलामी उत्पन्न करितो आणि ती हागार आहे. 25 कारण ही हागार, अरबस्तानांतील सीनाय पर्वत आणि वर्तमान
काळांतील यरूशलेम दर्शविते, जी आपल्या मुलाबाळांसह गुलामीत आहे. 26 परंतु यरूशलेमेवर जी आहे, ती स्वतंत्र
आहे आणि आपल्या सर्वांची आई आहे. 27 कारण लिहिले आहे की, 'हे वांझ स्त्री, तूं जी मुलांना जन्म देत नाहीस, तूं
जिला प्रसूति पीडा नाहीये, आनंदाने जल्लोष कर, कारण पति जिवंत असलेल्या स्त्रीच्या संतानांपेक्षा, त्यागलेल्या

(उजाडपणाच्या) स्त्रीचे संतान अधिक आहेत.'
28 आता भाऊबहिणींनो, आपण प्रतिज्ञेचे संतान आहोत. 29 दैहिक इच्छेने जो जन्मला होता, त्याने आत्म्याने
जन्मलेल्याला जसे छळले होते, तसेच आज देखील आहे. 30 बायबल काय सांगते? ‘हेच की गुलाम स्त्री आणि तिच्या
मुलाला घालवून द्या, कारण गुलाम स्त्रीचा मुलगा, स्वतंत्र स्त्रीच्या मुलांबरोबर हक्कदार होणार नाही.’ 31 यास्तव माझ्या
बंधुभगिनींनो, आपण गुलाम स्त्रीची मुलें नाहीत, परंतु स्वतंत्र स्त्रीची संतान आहोत.

# 5

1 ख्रिस्तांनी आपल्याला ज्या स्वातंत्र्यासाठी मुक्त केलेले आहे त्यात मजबूतीने स्थिर रहा, गुलामीच्या बंधनांत बांधले
असणे स्वीकार करू नका.
2 मी पौल तुम्हांला सांगतो की जर तुम्ही सुंता करून घेतली तर ख्रिस्तापासून काही फायदा होणार नाही. 3 मी गांभिर्याने
प्रत्येक मनुष्यासमोर ही घोषणा करितो की जो सुंता करून घेतो, त्याला सर्व नियम (धार्मिक नियम) पाळावे लागतील.
4 तुम्ही जे नियमशास्त्राद्वारे सच्चे व सिद्ध ठरविले जाण्याची इच्छा बाळगता, आता ख्रिस्त तुमच्यापासून एका अंतरावर
आहेत. तुम्ही अति महान कृपेपासून खालच्या स्तरापर्यंत पडला आणि कृपा मुकला (लांब गेला)आहा. 5 आत्म्याद्वारे
आपण उद्धाराच्या सर्व फायद्यांची वाट पाहात आहोत. 6 येशू ख्रिस्तांमध्ये सुंता झालेला किंवा सुंता न झालेला काही प्राप्त
करेल असे नाही, पण तो खात्रीने विश्वास प्राप्त करून घेऊ शकतो व विश्वास प्रेमाद्वारे प्रेरित आहे.
7 तुम्ही तर चांगले धावत होता, कोणी तुम्हांला अडथळा (अटकाव) केला की तुम्ही सत्य मानू नये? 8 ही शिकवण
तुम्हांला त्यांच्यापासून मिळत नाही, ज्याने तुम्हांला बोलाविलेले आहे. 9 थोडेसे खमीर संपूर्ण कणकेला खमीरी (फुगवून)
करून टाकते; 10 मला येशूंठायी तुमच्यावर विश्वास आहे, की तुम्ही दुसरी कोणतीही शिकवण स्वीकार करणार नाही
आणि जो कोणी तुम्हांला अडचणीत व पिडेत घालतो आहे, मग तो कोणीही असो, त्याला दंड मिळणारच.
11 भाऊबहिणींनो माझ्याविषयी म्हणाल तर, जर मी अजूनही सुंतेचा संदेश देत असेन, तर मी छळ का सहन करीत आहे?
जर असे आहे तर क्रूसाचे अडखळण असण्याविषयीची बाबच राहिलेली नाहीये! 12 जे तुम्हांला त्रस्त करीत आहेत,
त्यांनी आपल्या स्वतःचे अंग कापून टाकले तर किती बरें झाले असते.
13 बंधूभगिनींनो, तुम्हांला स्वतंत्रतेकरिता बोलाविले गेलेले आहे, पण तुम्ही या स्वच्छंदीचा उपयोग आपली शारीरिक
इच्छा पूर्ण करण्याकरितां करू नका, त्याऐवजी तुम्ही एकमेकांची सेवा करा. 14 संपूर्ण नियमशास्त्राचा सारांश हाच आहे
की, ‘तुम्ही आपल्या शेजाऱ्यावर (दुसऱ्यांवर), आपल्यासारखे प्रेम करा.’ 15 पण जर तुम्ही एकमेकांना फाडून खात
असाल, तर सतर्क रहा आणि जपा की तुम्ही एकमेकाला संपवून (नष्ट) टाकू नये .
16 म्हणूनच मी म्हणतो की आत्म्याद्वारे जीवन जगा, म्हणजे तुम्ही आपल्या इच्छेनुसार जगणार नाही, 17 कारण जुना
स्वभाव, पवित्र आत्म्याविरूद्ध इच्छा बाळगतो आणि पवित्र आत्मा जुन्या स्वभावाविरूद्ध. हे एक दुसऱ्यांचे विरोधक
आहेत, यासाठी की जे करावयाची तुमची इच्छा आहे, ते सर्व तुम्ही करू नये. 18 पण जर तुम्ही पवित्र आत्म्याच्या
मार्गदर्शनात जीवन जगत आहा, तर तुम्ही नियमशास्त्राच्या आधीन नाही;
19 जुन्या स्वभावाची कार्ये अशी आहेत: व्यभिचार, अशुद्धपणा, दुष्टाई, 20 मूर्तिपूजा, चेटकें, वैर, ईर्ष्या, क्रोध, हत्या,
चुकीची शिकवण दारूबाजी इत्यादि. 21 द्वेषभाव, रंगेलपणा, व कामवासना अशी अनेक कृत्यें यांच्यासंबंधी मी तुम्हांला
आधीच सांगितले आहे, की जे लोक ही सर्व कृत्यें करीत असतात, ते परमेश्वराच्या राज्याचे हिस्सेदार होणार नाहीत.
22 परंतु पवित्र आत्म्याचे फळ: प्रेम, आनंद, शांति, धीर, सहनशीलता, दयाळूपणा, चांगुलपणा, विश्वास, 23 नम्रता
आणि आत्मसंयम आहे. या सर्वांविरूद्ध कोणतेही नियमशास्त्र नाहीये. 24 जे ख्रिस्तांचे झाले आहेत, त्या सर्वांनी
अभिलाषा आणि इच्छासमवेत, जुना स्वभाव क्रूसावर खिळून टाकलेला आहे. 25 जर आपण पवित्र आत्म्याठायी जिवंत
आहोत, तर त्यानुसारच आपण आपले जीवन जगावे. 26 आपण खोटया प्रशंसेची इच्छा (हाव) बाळगून, एकमेकांना
चिडवू नये आणि एकमेकांचा हेवा देखील करू नये.

# 6

1 भावांनोबहिणींनो, सच्चेपणापासून व येशूंच्या सत्यापासून एखाद्याने भटकण्याची दाट शक्यता आहे, परंतु तुम्ही जे
विश्वासीं लोक आहा तुमच्याबरोबर असे होऊ नये .हे गरजेचे आहे की तुम्ही देखील सावध असावयास हवे. जो मार्ग
भटकला आहे,त्या मनुष्याला नम्रतेने व प्रेमाने समजावीत जा. 2 एकमेकांचे ओझे वाहून, ख्रिस्त येशूंचा नियम पूर्ण करा.
3 एखादा मनुष्य जो काही नाही पण असा विचार करितो की तो कोणी तरी आहे, तर तो स्वतःला धोका देत असतो.
4 प्रत्येक मनुष्याने आपले कार्य पारखावे आणि तसे करून दाखवावे, म्हणजे त्याला एखाद्या दुसऱ्याच्या कार्यामुळे नव्हें
तर स्वतःच्या कार्याविषयी आनंदी होण्याची संधी मिळेल, 5 कारण प्रत्येकाला आपले ओझे स्वतःच उचलावे लागेल.
6 ज्यांना दुसऱ्यांपासून वचनांची शिकवण मिळते त्यांनी सर्व उत्तम वस्तु त्यांच्याबरोबर वांटून घ्याव्यात.
7 धोक्यांत राहू नका, परमेश्वर मस्करीचा विषय समजला जाऊ शकत नाही, मनुष्य जे काही पेरितो, तेच पीक
मिळवील. 8 जो आपल्या अंतःकरणानुसार जगेल, तो नाशाचे पीक मिळवील. जो पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनात
चालेल, तो पवित्र आत्म्याचे अनंतकालिक पीक प्राप्त करील. 9 चांगुलपणाची कार्यें करण्यात थकून जाऊ नका, कारण
जर आपण हात टेकून न देता, न खचता हिंमत बाळगली तर खात्रीने निश्चित समयी पीक पाहू शकू. 10 म्हणून जेव्हा
जेव्हा आपल्याला संधी मिळते, आपण सर्वांशी चांगुलपणाचा व्यवहार करावा, विशेषकरून त्यांच्याबरोबर जे विश्वासी
घराण्याचे आहेत. 11 मी आपल्या हातांनी मोठ्या अक्षरांनी कशा प्रकारे लिहिले आहे, ते पाहा!
12 जे लोक सुंता करण्याची इच्छा बाळगतात, ते ख्रिस्तांच्या क्रूसांमुळे येणाऱ्या छळापासून स्वतःला वाचविण्यासाठी
तसे करितात. 13 जे लोक सुंता करून घेतात, ते देखील नियमशास्त्राचे पालन करीत नाहीत. ते तुमची सुंता यासाठी करू
इच्छितात, की तुमच्यामुळे त्यांना गर्व करिता यावा. 14 परंतु परमेश्वर असे करो की ज्यामुळें माझ्याकरिता जग क्रूसावर
खिळले गेले आहे आणि मी जगाकरिता, त्या मला येशू ख्रिस्तांच्या क्रूसाशिवाय दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचा गर्व असू
नये. 15 ख्रिस्तांठायी सुंता होणे व सुंता न होणे याचा काही अर्थ नाही, परंतु केवळ एक नवी सृष्टि होय, 16 जे या
नियमांनुसार जीवन जगतात आणि वागतात त्यांना शांति व अनुग्रह (कृपा) मिळो,आणि परमेश्वराच्या इस्त्राएलावर
देखील कृपा असो.
17 आता यापुढे कोणी मला त्रास देता कामा नये, कारण मी आपल्या देहावर येशू ख्रिस्तांच्या खुणा (चिन्हें) धारण
करून सहन करितो आहे.
18 भाऊबहिणींनो, प्रभू येशू ख्रिस्तांची असीम कृपा (अनुग्रह) तुमच्या आत्म्याबरोबर असो, होय असेच होत राहो.